# DAYANAND ANGLO VEDIC PUBLIC SCHOOL, AIROLI
## SAMPLE PAPER 2024 - 25
## SUB - MARATHI

**STD : VIII** **MAXIMUM MARKS: 80**
**DATE : 29 /08 /2024** **DURATION : 3 HOURS**

---

सर्वसाधारण सूचना:

१) या प्रश्नपत्रिकेत- अ ,ब ,क ,ड असे चार विभाग आहेत.

२) सर्व विभाग आवश्यक आहे.

३) सर्व विभागाची उत्तरे क्रमाने लिहावीत.

४) एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच लिहावीत.

---

## विभाग - 'अ' - वाचन व आकलन- 15 गुण

प्रश्न १) उतारा वाचून त्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायामधून निवडा. (८×१=८)

निसर्गातील प्रत्येक दृश्य माणसाच्या मनाला आनंदित करणारे आहे. सूर्यास्ताच्या वेळी आकाशात अवर्णनीय शोभा दिसते . सूर्यबिंब लालभडक झालेले असते आणि मेघांच्या पटलावर संध्यारागाच्या अनंत छटा पसरलेल्या असतात . किलबिलाट करीत घरट्याकडे पक्षी परतत असतात सकाळी भिन्न भिन्न मार्गांनी उडालेले हे पक्षी संध्याकाळी मात्र गटागटाने घराकडे येतात . रानावनात चरावयास गेलेली गुरेढोरे सुद्धा आतुरतेने घराकडे येत असतात . गाईची आचळं वासरांच्या ओढीने तुडुंब भरलेले असतात . अधीर होऊन हंबरत त्या गोठ्याकडे धावतात . तेव्हा त्यांच्या गळ्यातील तो घंटानाद कानाला तृप्त करतो. त्याच वेळी त्यांच्या पावलांनी उडालेली धूळ वातावरणात लाल रंग मिसळतो आणि वातावरणाला पवित्र करते. मंद मंद वाऱ्याच्या झुळका झाडे वेलींना हिंदळवतात . हळूहळू काळोखाची मखमल धरती पांघरते आणि सारे विश्व विश्रांतीत रममाण होते.

**प्रश्न -**

**१) निसर्गातील प्रत्येक दृश्य कसे असते ?** 1

१) आनंदी करणारे २)उल्हास उत्पन्न करणारे ३)दुःखाचे सावट देणारे ४)मनाला आनंदी करणारे

**२) मेघांच्या पटलावर कशाच्या छटा असतात ?** 1

१) संध्या रागाच्या २)भैरवी रागाच्या ३)संध्याकाळच्या ४)काळोखाच्या

**३) झाडे वेलींना कोण हिंदळवतात ?** 1

१)सोसाट्याचा वारा २)मंद वारा ३)मंद वाऱ्याच्या झुळका ४)जोरात वाहणारी हवा

**४) कशाची मखमल धरती पांघरते ?** 1

१) काळोखाची २)अंधाराची ३)शांततेची ४)रात्रीची

**५) सूर्यबिंब कसे झालेले असते ?** 1

१) लालभडक २)लालसर ३)तांबूस ४)सोनेरी

**६) काय करत पक्षी घरट्याकडे परततात ?** 1

१) फडफड करत  २)किलबिलाट करत  ३)किलकिलाट करत  ४)उडत उडत

**७) गाईच्या गळ्यात घंटानात किंव्हा होतो ?**

१) गोठ्याकडे धावत जाताना.  २) वासराकडे धावत जाताना.

३) रस्त्याने चालताना.  ४) चालताना माना डोलताना.

**८) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा .** **1**

१) काळोख -  २) भिन्न –

**प्रश्न २) खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(७×१=७)**

कुठलाही स्वार्थ न बाळगता, आपल्यावर सर्वात जास्त प्रेम करणारी ही आईच असते. आईच्या वात्सल्याचा एक प्रसंग माझ्या कायम लक्षात राहिला .पावसाळा नुकताच संपला होता .माझी शाळा सुटायची वेळ झाली होती आणि अचानक आभाळ भरून आले. मी घाबरलो कारण माझ्याजवळ छत्री ,रेनकोट यापैकी काहीच नव्हते मी भरभर चालू लागलो आणि अर्ध्या रस्त्यातच मुसळधार पावसाला सुरुवात झाली. मी एका झाडाचा आसरा घेतला ; पण पाऊस इतका जोरदार होता ,की मी जवळ जवळ भिजलोच . आता मला रडू आले .तेवढ्यात कोणीतरी येऊन पटकन माझ्या डोक्यावर छत्री धरली .मी मागे वळून पाहिले तर खुद्द आईच तिथे हजर होती. मी तिला घट्ट मिठी मारली .मी छत्री घेण्यास विसरलो होतो हे आईच्या लक्षात होते आणि केवळ मी पावसात भिजू नये ,म्हणून ती कामावरून येऊन स्वतः थकलेली असून सुद्धा धावत-पळत माझ्यासाठी छत्री घेऊन आली .त्या क्षणाला मला जे वाटले ते शब्दात सांगणे माझ्यासाठी खूप कठीण आहे .मुलांवर येणारं संकट मग ते कितीही लहान-मोठे असो , आईला ते जाणवतच .परमेश्वरी अंश असलेल्या अशा या आईच्या नावाच्या दैवताला माझा कोटी कोटी प्रणाम !

**प्रश्न :-**

**१)कोण आपल्यावर जास्त प्रेम करते ?**

१) आई  २) बाबा  ३) भाऊ  ४) बहीण

**२) मुलाजवळ कोणती गोष्ट नव्हती ?**

१) पाटी-पेन्सिल  २) छत्री ,रेनकोट  ३) आई-बाबा  ४) मित्र-मैत्रिणी

**३) आई कोठून आली होती ?**

१) कामावरून  २) घरातुन  ३) बाजारातून  ४) बागेतून

**४) आईला कोणाचा अंश मानला जातो ?**

१) वात्सल्याचा  २) परमेश्वराचा  ३) प्रेमाचा  ४) आपुलकीचा

**५) मी भरभर चालू लागलो (वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय ओळखा )**

**६) दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.  1. बाई  2. वात्सल्य**

**7. दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा .  1. लहान  2. कठीण**

## विभाग – ब - 'व्याकरण' 20 गुण

**प्रश्न ३)अ) खालील प्रश्न सूचनेप्रमाणे सोडवा.** **(४×१=४)**

१) मला चहा किंवा कॉफी मिळेल काय? ( वाक्यातील उभयान्वयी अव्यय ओळखा.)

२) अरे! काय झाले तूला ? ( वाक्यातील केवलप्रयोगी अव्यय ओळखा.)

३) जिगरबाज भटक्यासाठी कावळा किल्ला सज्ज आहे. ( वाक्यातील शब्दयेगी अव्यय ओळखा. )

४) परत आपण डांबरी रस्त्यावर येतो. ( वाक्यातील क्रियापद ओळखा. )

५) समीर हुशार मुलगा आहे. ( वाक्यातील नाम ओळखा.)

**ब) समानार्थी शब्द लिहा.** **(२×१=२)**

१) गाव २) सावली

**क) विरुद्धार्थी शब्द लिहा** **(२×१=२)**

१) शेवट २) चढण

**ड) वचन बदला** **(२×१=२)**

१) २)

**[) लिंग बदला** **(२×१=२)**

१) सेवक २) महाराज

**[-) विरामचिन्हे ओळखा व त्यांची नावे लिहा.** **(२×१=२)**

१) ? २) !

**उ) वाक्याचे प्रकार ओळखा.** **(३×१=३)**

१) ती रात्र त्यांनी पहाडावर घालवली.

२) काय सुंदर देखावा आहे हा !

३) वर्गात शांत बसावे.

**ऊ) वाक्यातील काळ ओळखा.** **(३×१=३)**

१) मुलगा पुस्तक वाचतो.

२) मी फुले तोडली .

३) शाळेची घंटा वाजली

**विभाग –' क' पाठ्यपुस्तक आधारित 30 गुण**

**प्रश्न - ५ अ ) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ५ )** **(५×१=५)**

१) लेखकाचा कॅनव्हास म्हणजे काय होते ?

२) सगळ्या अवयवांनी कोणाकडे तक्रार केली ?

३) कोणत्या महिन्यात पावसाचे वेध लागतात ?

४) लेखकाच्या नातवंडांची नावे लिहा ?

**ब) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा .** **(४×१=४)**

१) कोकणातील निसर्ग पहात शांत उभी राहून -------- अनुभवायला हवे.

२) इशांतला आता खूप ------ लागली होती.

३) कावळा किल्ला ------- भटक्यानकरिता सज्ज आहे .

४) पिल्लांची आई --------रंगाची आहे.

**क) खालीलपैकी कोणत्याही एक प्रश्नाचे स्वमत लिहा. (कोणतेही १)** **(३×१=३)**

१) वरंधा घाटाचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.
२) लेखकाने सांगितलेले व्यायामाचे महत्त्व तुमच्या शब्दात लिहा.
३) "पोटोबाबद्दलची तक्रार सांगून सर्व इंद्रियांनी ती तक्रार करण्याची कारणे स्पष्ट करा.
४) तुम्हाला जाणवलेली ईशानची गुणवैशिष्ट्ये लिहा.

**ड) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील वाक्यांमधील योग्य त्या ठिकाणी वापरकरून वाक्य पुन्हा लिहा.** **(५×१=५)**

( पालन पोषण करणे, वेध लागणे, अद्दल घडवणे, अवलंबून राहणे, हिरमोड करणे,सज्ज होणे )

१) शेतकऱ्याचे जीवन पावसावर विसंबून असते.

२) वर्गात पहिला नंबर न आल्याने राजू नाराज झाला.

३) चोरी केल्यामुळे चोराला पोलिसांनी शिक्षा केली.

४) सिंधुताई सपकाळ लहान मुलांचे संगोपन करतात.

५) सैनिक लढाईसाठी तयार होते.

**प्रश्न ६) अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.** **(५×१=५)**

१) कवितेच्या अनुभवातून हे जग कसे आहे?

२) झुळकेचा विश्रांतीचा प्रहर कोणता ?

३) कवीने कष्टकऱ्यांना कोणते नाव दिले आहे ?

४) प्रतिभेची प्रभात कुठे होणार आहे ?

५) कष्टकऱ्यांचे माता पिता कोण आहे?

**ब) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा.** **(५×१=५)**

१) भव्य ---------- बाग मनोहर.  (मैदान , पटांगण, रणांगण)

२) गुरुजनांची ---------- शिकवण या स्पर्धेच्या युगात,  (अमूल्य, विनामूल्य, अतुल्य)

३) विचारधारा तिची वाहते--------- रगारगांत.  (नसानसांत, मनामनात, उरात)

४) आम्हीच आमचे -----------  (विधाते, भाग्यविधाते, कार्यकर्ते)

५) मार्ग वेगळा नाही आम्हा --------- वेगळा नाही.  (स्वर्ग, कर्म, मार्ग)

**क) खालीलपैकी काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. (कोणतेही-१)** **(१ × ३=३)**

१) इमान आम्हा एकच ठावे घाम गाळूनी काम करावे ||

२) गुरुजनांची अमूल्य शिकवण या स्पर्धेच्या युगात ||

## विभाग -' ड ' -लेखन 15 गुण

**प्रश्न ३) अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.** **(१ × ६=६)**

१) माझा आवडता प्राणी  २) माझा आवडता मित्र \ मैत्रीण  ३) माझा आवडता खेळ  ४) माझा छंद  ५)शेतकरी

**ब) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा कथेला शीर्षक द्या व तात्पर्य लिहा. (कोणतेही १)** **(१ × ५=५)**

१) लोभी माणूस - मुद्दे - लोभी माणूस- तपश्चर्या - परमेश्वर प्रसन्न - वरदान - सूर्य मावळेपर्यंत जेवढा धावत जाशील तितकी जमीन तुझी - पळतच राहणे - सूर्यास्त होणे - शेवटी थकून मरून पडणे - अति लोभाचे फळ - तात्पर्य.

२) भांडणाचा परिणाम मुद्दे - दोन मांजरे- लोण्याचा गोळा- यांचे समान भाग- याबद्दल वाद- झाडावरून माकडाचे खाली येणे - तराजू आणणे - समान भाग करणे - दरवेळी एका पारड्यात जास्त भाग - माकडाने लोणी खाणे - अखेर मांजराला काही न मिळणे - माकडाचे पलायन - तात्पर्य. -

**क) खालील विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) (कोणताही १)** **(१ × ४=४)**

१) समीर / सिमरन दळवी २४०, सहकार नगर, नाशिक येथून आपल्या राहत्या भागात कचरा गाडी नियमित येत नसल्याने, तक्रार करणारे पत्र नगरपालिका, नाशिक यांना लिहितो/ लिहिते.

२) बुक डेपो भांडुप गाव मुंबई-४०००८९. येथून तुमच्या शाळेच्या वाचनालयासाठी इयत्ता पाचवी ,सहावी व सातवी यांची पाठ्यपुस्तके मागवणारे पत्र लिहा.